# चिमुकल्या चेहऱ्यांवर त्यांनी फुलविला आनंद



अनाथ मुलांसोबत सुटीचा आनंद लुटताना डॉ. लोगनाथन आणि त्यांचे कुटुंबीय.

## सुटीचा सदुपयोग : परदेशी कुटुंबाचा सामाजिक उपक्रम

सचिन उन्हाळेकर : सकाळ वृत्तसेवा

मुंबई : मे महिना असो की दिवाळी किंवा नाताळाची सुट्टी पडली की धमाल करण्याचे विविध प्लॅन्स आधीपासूनच तयार असतात. विविध समुद्रकिनारे, एखादे ट्रेकिंग नाहीतर मग परदेशवारी करण्याचे बेत आखले जातात. पण या सुट्टीत स्वत:बरोबरच दुसऱ्यांमध्ये आनंद फुलविण्याचे काम करणारे अगदी थोडकेच. यामध्ये सिंगापूरच्या डॉ. विजयानन लोगनाथन आणि त्यांच्या कुटुंबीयांचे कार्य हे अनमोल असेच आहे.

डॉ. लोगनाथन आणि कुटुंबीय सिंगापूरमधून भारतात आले आणि त्यांनी सीसीटीडी या सामाजिक संस्थेतील अनाथ मुलांबरोबर दहा दिवस सुट्टीचा आनंद लुटला. मस्तीबरोबरच या कुटुंबाने मुलांमधील कलागुणांनाही वाव दिला. त्यांनी मुलांकडून अनेक कलाकुसरीच्या वस्तू बनवून घेतल्या. या वस्तू विकून त्यातून मिळणारे उत्पन्न मुलांसाठीच खर्च केला जाणार आहे.

डॉ. लोगनाथन लहानपणापासून भारतात येतात. त्यामुळे त्यांना भारताच्या संस्कृतीविषयी आदर निर्माण झाला आहे. पण भारतात केवळ फिरण्यापेक्षा काहीतरी वेगळे करण्याच्या उद्देशाने त्यांनी सुट्टीचा सदुपयोग करण्याचे ठरविले आहे. त्याप्रमाणे २००७ पासून ते भारतातील सामाजिक संघटनांबरोबर सुट्टी घालवितात. निराधार मुलांसाठी सीसीटीडी संस्थेचे आश्रय, आकार, अंकुर आणि उमंग हे उपक्रम आहेत.

१८ मे रोजी विजयानन आपल्या बहिणी आणि मित्रांसोबत मुंबईत आले आहेत. विजयानन स्वतः दंतचिकित्सक आहेत. त्यांची बहीण नली ही शिक्षिका, माला ही नर्सिंग ऑफिसर आणि मानगय ही बहीण एका बड्या कंपनीत व्यवस्थापन अधिकारी आहे. सीसीटीडीच्या अनाथ मुलांसोबत चित्रपटगृहात जाऊन त्यांनी सिनेमाही पाहिला. वांद्रे येथील सेंट जोसेफ हायस्कूलमध्ये विविध कलाकुसरीच्या वस्तू या मुलांकडून करवून घेतल्या. त्यामध्ये टीशर्ट रंगवण्यापासून मडक्यांवर कलर भरेपर्यंत आणि टाकाऊपासून टिकाऊ वस्तू तयार करण्याचे धडे देत त्यांच्यामध्ये आत्मविश्वासाचे बीज रुजवण्याचे काम त्यांनी केले.

उद्या (ता. २) हे कुटुंबीय सिंगापूरला परतत आहे. पुन्हा आम्ही दिवाळीच्या सुट्टीत मुंबईत येणार असून आम्ही शिकवलेल्या वस्तू मुलांच्या किती लक्षात राहिल्या आहेत हे पडताळणार आहोत, असे विजयानन म्हणाले.